क्र.का.४/प्र.क्र.११३८/२००३/२४३५-८०
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,पुणे १.
दिनांक :- २८ / ०९ /२००३.

प्रति,
१) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
२) सर्व सह जिल्हा निबंधक.
३) दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई / बांद्रा.

**विषय :-** आयकर अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार दस्तऐवजामध्ये स्थायी खाते क्रमांक (PAN) नमूद करुन घेणेबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का.४/प्र.क्र.३०५२/६८९-७४३, दि. २४/०५/२०००.

आपले लक्ष या कार्यालयाचे संदर्भाधीन परिपत्रकाकडे वेधण्यांत येत आहे. या परिपत्रकासोबत सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस, नवी दिल्ली यांचेकडील दि. ०९/१०/१९९८ रोजीचे अधिसूचनेची प्रत सर्वांच्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेली आहे. तसेच या परिपत्रकातील सूचनांचे सर्व नोंदणी अधिकारी यांनी काटेकोरपणे पालन करावे असे आदेशित केले आहे.

तथापि उपरोक्त तरतुदीचे पालन नोंदणी अधिकाऱ्याकडून केले जात नसल्याची बाब या कार्यालयाचे निदर्शनास आली आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. यात कर्तव्य कसूर करणाऱ्यास आयकर अधिनियम १९६१ चे कलम २७२ - बी नुसार १०,०००/- रुपये दंडाची तरतूद आहे.

तरी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व नोंदणी अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे पुन्हा सूचना देण्यांत याव्यात.

**अ)** आयकर अधिनियम १९६१ चे कलम १३९ - अ पोट कलम (५) मधील खंड (सी) व आयकर नियम १९६२ चे नियम ११४ (बी) मधील तरतुदीनुसार रु. ५ लाख व त्यापेक्षा अधिक मूल्याचे खरेदी-विक्री / हस्तांतरणाच्या दस्तऐवजामध्ये लिहून घेणार व लिहून देणार यांचा आयकर कायद्याखाली दिलेला स्थायी खाते क्रमांक ( PAN पॅन ) अथवा जनरल रजिस्टर नंबर ( GIR ) नमूद करुन घेणे आवश्यक आहे. हे नंबर उपलब्ध नसल्यास फॉर्म नं. ६० मध्ये घोषणापत्र घेणे अनिवार्य केलेले आहे. तसेच नियम ११४- सी नुसार शेती उत्पन्नाबाबत फॉर्म नंबर ६१ मध्ये घोषणापत्र घेणे आवश्यक आहे. नियम ११४-डी अन्वये दस्तांची माहिती व फॉर्म नं. ६० व ६१ मध्ये घेतलेले घोषणापत्र संबंधित आयकर संचालक ( अन्वेषण ) यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे.

**ब)** दस्त नोंदणी करण्यापूर्वी योग्य पॅन / जी.आय.आर. नंबर दस्तात नमूद असल्याची खात्री करणे अथवा फॉर्म नं. ६० व ६१ मध्ये घोषणापत्र घेण्याची जबाबदारी दुय्यम निबंधक यांची आहे. यात कर्तव्य कसूर करणाऱ्या नोंदणी अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल याची सर्व संबंधितांना समज द्यावी.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे करिता.

d-4-3/Deshpande 17.09.03.